# "पर्यावरण चळवळीचे भारतीय आयाम व महात्मा गांधीजींच्या पर्यावरण विषयक विचारांची उपयुक्तता"

**समाधान आबा जाधव,** सहा.प्राध्यापक, इतिहास विभाग, प्रा.डॉ.एन.डी.पाटील महाविद्यालय, मलकापूर (पेरीड) ता.शाहूवाडी, जि. कोल्हापूर, rajesyam77@gmail.com

---

**प्रस्तावना**

नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत उपयोग पर्यावरणाचा ऱ्हास थांबवणे किंवा पर्यावरणाचे जतन करणे या दिशेने जाणीवपूर्वक निर्देशित केलेली एक संघटित सामाजिक प्रक्रिया म्हणजे पर्यावरण चळवळ होय.भारतात १९७०नंतर मोठ्या प्रमाणात पर्यावरणीय चळवळींचा उदय झाला.या पर्यावरणीय चळवळी ह्या हिमालयीन प्रदेशापासून केरळ,गुजरात, त्रिपुरा व उष्णकटिबंधीय जंगल इथपर्यंत पसरल्या. लोकांचे विस्थापन पाणी,जमीन,जीवन प्रणाली, पर्यावरणीय समतोल यासारख्या मानवी हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पा विरोधात ही पर्यावरणीय आंदोलने उभी राहिली.उत्तर प्रदेशातील चिपको आंदोलन,भागीरथी बचाओ, स्टॉप तिहेरी प्रकल्प,मध्य प्रदेश व गुजरात मधील नर्मदा बचाव आंदोलन, ओरिसामधील बालीपाल आणि भोगराई चाचणी युवा संघटना,गंधमर्दन टेकड्या मधील आदिवासी लोकांची चळवळ ह्या पर्यावरणीय चळवळीच होत्या.पश्चिम घाटातील अपिको चळवळ, कर्नाटकातील कैगा अणूप्रकल्पाला विरोध करणारा गट,सायलेंट व्हॅली प्रकल्पा विरोधात सुरू असलेली मोहीम, ग्रामीण स्त्री उन्नती समाजाची स्थापना बांकुरा जिल्हा उत्तर प्रदेश इथे झाली.पडीक जमिनीवर आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी आणि त्रिपुरातील गोमती धरणाला विरोध करण्यासाठी या संघटनेची स्थापना झाली होती.कोसी,गंडक,तुंगभद्रा या नद्यांच्या खाली आणि पंजाब,हरियाणाच्या सिंचना खालील भागात जंगलतोड, शहरीकरणआणि वाळवंटीकरणाच्या विरोधात स्थानिक पर्यावरणीय आंदोलने उभी राहिली.पाणी चेतना पंचायत, मुक्ती संघर्ष यासारख्या स्थानिक चळवळी देखील पर्यावरण वाचवण्यासाठी झाल्या.भारतात नागरिकरण व विकासाच्या प्रक्रियेमुळे प्रचंड विस्थापन,सामाजिक आर्थिक नुकसान,संसाधनांचा नाश हा झाला आहे. या विरोधात भारतामध्ये पर्यावरणीय चळवळी या उभ्या राहिल्या.या चळवळीतून अन्यायकारक विस्थापनाच्या विरोधात,सन्माननीय पुनर्वसन,विकास प्रकल्प,धोरणावर प्रश्नचिन्ह या पर्यावरणीय चळवळीने उभे केले.पर्यावरणीय चळवळींनी गरीब आणि उपेक्षितांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी एक नवीन राजकीय संघर्ष सुरू केला आहे. पर्यावरण हा आज जगातील सर्वात जास्त चर्चिला जाणारा विषय आहे.१९६०च्या दशकानंतर जगासमोर आणि मानवतेसमोर खरे संकट पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या माध्यमातून उठले.अठराव्या शतकात औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली.आणि जगाचे स्वरूप झपाट्याने बदलत गेले.जागतिक तापमान वाढ, वातावरणीय बदल इत्यादींचा समावेश हा पर्यावरण बदलाच्या अनुषंगाने होत होता. जागतिक तापमान वाढ, वातावरणीय बदल, अलीकडच्या काळातील अतिवृष्टी,प्राण्यांची वाढती संख्या,जगाची वाढती लोकसंख्या,त्याच बरोबर वाढणारे नागरिकरण आणि पर्यावरण याचा विचार आजच्या कालखंडामध्ये पर्यावरण ऱ्हास या अनुषंगाने होत आहे.वर उल्लेखित केलेल्या अनेक पर्यावरणवादी चळवळी भारतात आजही चालू आहेत.भारतातील पर्यावरणवादी चळवळी पैकी एक महत्त्वाची चळवळ चिपको आंदोलन ही होती. चिपको आंदोलना चे नेतृत्व गांधीवादी असणाऱ्या नेत्यांनी केले होते. चिपको चळवळ ही एक महत्त्वाची पर्यावरणीय चळवळ आहे. या चळवळीने गांधीवादी अहिंसक पद्धतीचा अवलंब करून लक्षणीय लोकप्रियता आणि यश मिळवले.

प्रचंड वृक्षतोड,निसर्गाचा समतोल बिघडवण्यास कारणीभूत ठरली.पर्यावरणाला आपल्या मर्जीप्रमाणे वागवण्याच्या नादात मनुष्य हे विसरून गेला की मर्यादा संपली की निसर्गही आपला राग व्यक्त करतो. उदा.२६ जुलै चा मुंबईचा पाऊस, प्रलय, सुनामी, विकासाच्या नावावर निसर्गावर केलेले अतिक्रमण नको म्हणून निसर्गाने भूकंप,ज्वालामुखी,दुष्काळ निर्माण करून पर्यावरणाचा नाश थांबवण्याचा संदेश दिला आहे. प्लास्टिकमुळे मुंबई प्रत्येक पावसाळ्यात तुबंते.निसर्ग एकच कायदा सांगतो जगा आणि जगू द्या हे सांगत असताना निसर्ग सांगतो की निसर्गाच्या आरोग्याशी खेळाल तर नाश पावाल.[१]

आज जागतिक पातळीवर पर्यावरण विषयक समस्या हा प्रश्न अत्यंत क्लिष्ट बनलाआहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या जोरावर मनुष्याने संपूर्ण पृथ्वीवरील पर्यावरणाचा विध्वंस चालवला आहे.आज पर्यावरण विषयक समस्या हा विश्व चिंतनाचा विषय झाला आहे. पर्यावरणाला केंद्रस्थानी मानून मानवी प्रगतीचा विकास व पर्यावरण जपणूक करणाऱ्या महापुरुषांच्या विचारांचा पुन्हा नव्याने शोध आणि बोध घेतला जात आहे.जगाचा येणारा भविष्यकाळ पर्यावरणीय समस्या व मानवी अस्तित्वावर संकट असा असणार आहे. या परिस्थितीत संयमाने आत्मनिर्भरतेने सहयोगाने मार्ग काढण्याची ताकद महात्मा गांधीजींचे विचार देतात[२].या प्राप्त परिस्थितीत महात्मा गांधीजींच्या पर्यावरण विषयक विचारांचे स्मरण भारतातच नव्हे तर जगभरातील अभ्यासकांना होत आहे.

पर्यावरण आणि मानवी जीवन ह्या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक आहेत.मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा व त्यामधील बदलांचा अभ्यास करणे हे आजच्या २१ शतकामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे.पर्यावरण हा आज जगातील सर्वात जास्त चर्चिला जाणारा विषय आहे.पृथ्वीच्या वातावरणात सरासरी वाढ होत गेली.जागतिक तापमान वाढ, वातावरणीय बदल यासारख्या पर्यावरणीय समस्यांना कारणीभूत असलेले ज्वालामुखी, सूर्यकिरणांची दाहकता, हरितगृह वायू, प्राण्यांची वाढती संख्या, जगाची वाढती लोकसंख्या, त्याचबरोबर वाढणारे नागरीकरण आणि नागरीकरणाच्या वाढणाऱ्या सुविधा याचा परिणाम हा पर्यावरणावर झालेला दिसून येतो.नागरिकरण व पर्यावरण याचा सहसंबंध जवळचा आहे.औद्योगिक क्रांती मधून निर्माण झालेल्या पर्यावरणीय समस्या आज जगभरातील सर्वच देशांना भेडसावत आहेत.औद्योगीकरण व नागरिकरण हे मनुष्य आणि निसर्ग यांच्यासाठी खूपच घातक आहेत. यातूनच पर्यावरणीय ऱ्हास होतो आहे. महात्मा गांधी म्हणतात की "माणूस हा निसर्गाचा मालक नाही तर विश्वस्त आहे." त्यामुळे मनुष्याने विश्वस्त या नात्यानेच निसर्गाची काळजी घेतली पाहिजे[३].मानवी समूह विकसित होत असताना पर्यावरणाची सुद्धा काळजी घेतली पाहिजे.ही सामान्य बाब मनुष्य जात विसरली म्हणून आज जगभरामध्ये पर्यावरणीय समस्या अधिक विक्राळ रूप धारण करत आहेत.जागतिक तापमान वाढ, पर्यावरण बदल, निसर्गावर पर्यावरणावर होणारे बरे वाईट परिणाम व इतर अनेक अशा पर्यावरणीय समस्या भारतात देखील निर्माण झाल्या आहेत.आज पर्यावरण विषयक समस्यावर जगभरामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर संशोधन व लिखाण चालू आहे.या पार्श्वभूमीवर महात्मा गांधी यांनी पर्यावरण विषयक जे विचार मांडले होते त्याची उपयुक्तता आणि आजच्या काळामध्ये त्याची समर्पकता याचा आढावा हा प्रस्तुत शोधनिबंधामध्ये घेतलेला आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर औद्योगीकरणाचा वेग वाढला आणि त्याच वेगाने पर्यावरणाचे मुद्दे ही समोर येण्यास सुरुवात झाली. पर्यावरण होणाऱ्या परिणामांचा थेट फटका मानवी समाजावर बसत असल्याने १९६०च्या दशकामध्ये जागतिक पातळीवरती ग्रीन पीस, ग्रीन नेटवर्क फ्रेंड्स ऑफ अर्थ या संघटना उदयास आल्या.दुसऱ्या महायुद्धानंतर आधुनिकिकारणाचा वेग वाढला आणि त्याच वेगाने पर्यावरणाचे मुद्दे ही समोर येण्यास सुरुवात झाली.भारतामध्ये पर्यावरणीय चळवळींचा विचार करताना चारशे वर्षांपूर्वीच्या बिश्नोई समाजाने दिलेल्या बलिदानाची निश्चित अशी आठवण इतिहासात घेतली जाते.उत्तर प्रदेशात जंगल आणि झाडे वाचविण्यासाठी सुरू झालेली चिपको चळवळ, नर्मदा बचाव आंदोलन, टेहरी धरणाला विरोध करण्यासाठी झालेली आंदोलने अशी अनेक उदाहरणे भारतात पाहायला मिळतात. पर्यावरणाच्या मुद्द्यांना सद्यस्थितील प्रश्नांशी जोडण्यामध्येही या चळवळींना यश आले आहे. त्यामध्ये राजेंद्र शहाणी केलेले जलसंधारणाचे काम,गंगा बचाव चळवळ यापासून सध्या राबवण्यात येत असलेली कावेरी कॉलिंग अशी अनेक उदाहरणे पर्यावरणीय चळवळीच्या दृष्टिकोनातून आपल्याला सांगता येतील.रासायनिक खतामुळे पिकाबरोबर जमिनीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी महाराष्ट्रात ही झिरो बजेट शेती सारखे प्रयोग होत असून त्याची व्याप्ती कमी असली तरीही त्याचे महत्त्व नाकारता येत नाही. भारतात चालू असणाऱ्या पर्यावरणवादी चळवळी व महात्मा गांधीजींच्या पर्यावरण विषयक विचारांची आजची समकालीन उपयुक्त चा याचा शोध प्रस्तुत शोध निबंधात घेतला आहे.

**पारिभाषिक शब्द** :- पर्यावरण, पर्यावरणीय चळवळी, म.गांधी,चिपको आंदोलन, उपयुक्तता.

**उद्दिष्टे**

१ भारतातील पर्यावरणवादी चळवळी व महात्मा गांधीजींनी विशद केलेल्या पर्यावरण विषयक विचारांची उपयुक्तता याचा शोध घेणे.

२ श्रम आधारित औद्योगीकरणाची महात्मा गांधीजींची पर्यावरणीय संकल्पना शोधणे.

३ भारतातील पर्यावरणीय चळवळी व महात्मा गांधीजींचे निसर्ग,पर्यावरण विषयक विचार यांची समकालीन उपयुक्तता शोधणे.

**गृहीतके**

१ जगभरातील पर्यावरण वाद्यांच्या दृष्टीने महात्मा गांधीजींचे पर्यावरण विषयक विचार हे आजच्या पर्यावरणीय चळवळीच्या अनुषंगाने महत्त्वाचे आहेत.

२ निसर्गाचे दोहन व शोषणाला गांधीची हिंसाच मानत असत.

३ आज जगभरातील पर्यावरणाची गंभीर स्थिती पाहता महात्मा गांधीजींचे निसर्ग विचार महत्त्वाचे आहेत.

**संशोधन समस्या**

आज जगभरामध्ये पर्यावरणीय समस्या गंभीर बनत आहेत. मानवी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावरती मार्गदर्शक ठरणाऱ्या महापुरुषांचे विचार काय होते याचा शोध नव्याने सामाजिक शास्त्रात घेतला जात आहे.उपलब्ध लिखाण व अभ्यासातून गांधीजीचे निसर्ग विषयक किंवा पर्यावरण विषयक विचार सर्वसामान्या समोर आलेले नाहीत.

**महात्मा गांधीजींचे पर्यावरण विषयक विचार**

महात्मा गांधींनी स्वातंत्र्यानंतर नवसमाजाच्या निर्मिती करता विचार मांडले. नव समाजाच्या निर्मितीत पर्यावरण व निसर्ग विषयक थोडकेच पण महत्त्वाचे विचार मांडले आहेत. मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गाकडे भरपूर आहे. मानवाची गरज पूर्ण करण्यासाठी निसर्ग नाही असे महात्मा गांधीजींचे पर्यावरण विषयक तत्व असे होते. औद्योगीकरणातून निसर्गाची लूट हे चित्र विकसित व विकसनशील देशात दिसून येते. विकासाचे मॉडेल व पर्यावरणाचा ऱ्हास यावर चर्चा होत असताना शाश्वत मानवी विकास व पर्यावरणाचे संरक्षण या दृष्टीने गांधीजींचे विचार महत्त्वाचे ठरतात.माणसाच्या मूलभूत गरजांवर भर देणारा समाज निर्माण करणे. मानवी जीवनाची प्रगती होत असताना चैनीसाठी पर्यावरण व निसर्ग यास वेटीस धरणे हा अन्याय व शोषण आहे याची जाणीव गांधीजींचे विचार निर्माण करतात.निसर्गाची अमर्यादित लुट करणे ही गोष्ट गांधीजींना मान्य नव्हती[४]. मानव हा निसर्गाचाच एक भाग आहे. जागतिकरणात निसर्गाची लूट करून मानवी समाज विनाशाला निमंत्रण देत आहे. निसर्गाचा योग्य उपयोग व विचार करून जीवनशैली ठरवण्याचा प्रयत्न म्हणजे गांधी विचार पुढे नेणे होय.महात्मा गांधी पर्यावरण हा शब्द वापरत नसले तरी माणूस व निसर्ग यांचे संबंध कसे असावे याबाबत पर्यावरण विषयक तत्त्वज्ञान व ग्लोबल वॉर्मिंग काळातील या पर्यावरणाच्या घडामोडीवर हे विचार मार्गदर्शक आहेत. पर्यावरणीय ऱ्हास थांबवायचा असेल तर गांधीजींची नीतिमत्ता आपल्याला मार्ग दाखवू शकते. अन्न,वस्त्र,निवारा,विज्ञान तंत्रज्ञान,निसर्गाची हिंसा यामधून निर्माण होणारे प्रश्न,समाजाचे जीवन धोक्यात येईल.भारतीय संस्कृती ही पर्यावरणातील घटकांना जपणारी आहे. संस्कृतीतील परंपरा आणि निसर्ग यांचा फारसा फार जवळचा संबंध आहे. गांधीजींनी भारतीय संस्कृतीमधील पंचमहाभूतांचे महत्त्व अहिंसेच्या संकल्पनेत विशद केले होते [५].

२०ऑक्टोंबर १९२७च्या यंग इंडियाच्या अंकात महात्मा गांधीजी लिहितात "हिंदू धर्म केवळ मनुष्याचा नव्हे तर प्राणिमात्राचा साकल्याने विचार करतो."[६] संरक्षक म्हणून पर्वताची आराधना,वनस्पतीमध्ये देव पाहण्याची परंपरा, वनपूजा, नारळी पौर्णिमा, दसरा इत्यादी सर्व सणावरून भारतीय संस्कृतीमधील पर्यावरण विषयक असणारी जागरूकता लक्षात येते.जगभरात वृक्षतोड, जंगल नाश, अमर्याद खानकाम,भराव टाकून समुद्रात रियल इस्टेटचा व्यवसाय, पाण्याचा गैरवापर, उपसा सिंचन या अनुषंगाने हिंदू संस्कृतीमधील विचार महात्मा गांधी या लेखात प्रस्तुत करतात. हिंदू धर्मातील परंपरा व पर्यावरणाचे महत्त्व याबद्दल त्यांचे विचार महत्त्वाचे आहेत. वृक्ष पूजेचे महत्व विशद करताना निसर्गा विषयी असणारी सखोल भावना ते व्यक्त करतात वृक्षाच्या संवर्धनासाठी वृक्ष पूजेला महत्त्व दिले पाहिजे असा त्यांचा विचार होता.पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या औद्योगीकरणाऐवजी महात्मा गांधींना श्रमावर आधारित उद्योगाची कल्पना जगासमोर ठेवतात. [७]

**पर्यावरण विषयक गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता**

२१व्या शतकात जागतिक पातळीवर पर्यावरणीय समस्या गंभीर बनल्या आहेत.पर्यावरणीय समस्येवर उपाय शोधण्यासाठी आज जगभरातील सामाजिक संशोधनात महापुरुषांचे विचार काय होते याचा शोध इतिहासाच्या पानातून घेतला जात आहे.या पार्श्वभूमीवर अहिंसेचे पुजारी असणाऱ्या गांधींचे विचार व त्यांची पर्यावरणीय उपयुक्तता याचा शोध घेतला असता हे पर्यावरण विचार पर्यावरण वाचण्यासाठी मार्गदर्शक असे आहेत.निसर्गाच्या अतिरिक्त दोहानापेक्षा

नैसर्गिक संसाधनांचा सुयोग्य वापर गांधीजींना अपेक्षित होता.अमर्याद गरजा व पर्यावरणाचा ऱ्हास हे चक्र कायम राहिल्यास निसर्ग मनुष्य संघर्ष घडून येतील असे त्यांचे मत होते.'मानवी वस्तीत आज होणारे हिंस्र पशुंचे आक्रमण, प्राणी हल्ले यासंदर्भात त्यांचे विचार किती रास्त होते याची प्रचिती देतात. नागरीकरणाच्या संकल्पनेत नैसर्गिक संकटांना आमंत्रण देणाऱ्या बाबी थांबून सर्वांना स्वावलंबी बनवणे असे त्यांना अभिप्रेत होते.[९] हिंदस्वराज्यमध्ये त्यांनी म्हटले आहे की युरोपमधील अमर्याद यांत्रिकीकरण व औद्योगीकरणातून युरोप भकास बनेल जागतिक पातळीवर पर्यावरणीय समस्या व त्यातून उद्भवणारे धोके लक्षात येऊनही आर्थिक दबावा पुढे कळते पण वळत नाही अशी परिस्थिती आहे.आपल्या परंपरा व धर्म ग्रंथात पर्यावरण टिकवण्याची शिकवण आहे.पर्यावरण वाचवण्यासाठी ही शिकवण आज ही उपयुक्त आहे. गांधीजींनी धर्मातील हा निसर्ग विचारांचा केलेला उपदेश प्रासंगिक काळानुरूप बदल करून अंमलबजावणी करण्यासाठी आजही उपयुक्त आहे.पर्यावरण ऱ्हासाचे परिणाम धोके माहीत असूनही मानवी वर्तन बदललेले नाही. या पार्श्वभूमीवर महात्मा गांधीजींचे विचार ठळकपणे मांडण्याची गरज आहे.

**निष्कर्ष**

१. सामाजिक शास्त्रांतर्गत नव्याने शोधल्या जाणाऱ्या विचारात महात्मा गांधीजींचे पर्यावरण विचारऱ्हा रोखण्यासाठीचे दिशादर्शक आहेत.

२. निसर्गाचे शोषण हस्तक्षेप यालाही गांधीजी हिंसाच मानतात.

३. जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या पर्यावरणीय ऱ्हासाचे गांधीविरोधक होते.

४. युरोपातील औद्योगिक क्रांती मधून सर्वत्र पसरलेले औद्योगिक तत्वज्ञान,संस्कृती, भांडवलवाद कधीही गांधीजींनी सहजासहजी स्वीकारलेला नाही.

५. निसर्गाचा समतोल राहावा या विचारांचे गांधीजी होते.

६. हिंदू धर्मातील महात्मा गांधीजींनी केलेली निसर्ग विषय चिकित्सा अधिक विश्लेषितपणे पुन्हा शोधून त्याची अंमलबजावणी करून आचरणात आणणे गरजेचे आहे.

७. पर्यावरणीय ऱ्हासाच्या समस्येवर निसर्ग व जीवनशैली यासंदर्भात महात्मा गांधीजींचे विचार आजही उपयुक्त आहेत.

८. सामाजिक न्यायाचा प्रश्न सर्व पर्यावरणीय चळवळीमध्ये केंद्रस्थानी होता.

९. पर्यावरणीय चळवळीत ह्या तंत्रज्ञानाद्वारे निसर्गावरचे वर्चस्व याचा तिरस्कार करतात.

१०. आर्थिक विकासातून राष्ट्राचा विकास या धारणेच्या विरोधात पर्यावरणीय चळवळी आहेत त्यांना शाश्वत विकास अपेक्षित आहे.

११. पर्यावरणीय चळवळी ह्या सर्वसामान्य समूहापासून विकसित होतात व धोरणाच्या विरोधात हेच संघटित होऊन संघर्ष करून बदल घडवून आणतात.

१२. पर्यावरणवाद्यांच्या चळवळीच्या पद्धती प्रामुख्याने आजही सत्याग्रही स्वरूपाच्या आहेत.

१३. महात्मा गांधीजींच्या सत्याग्रह,सविनय कायदेभंग, अहिंसक निषेध,यावर ह्या चळवळी आजही कार्यरत आहेत.

१४. भारतातील प्रमुख पर्यावरणीय चळवळीमध्ये चिपको चळवळीचा समावेश होतो.चिपको चळवळ ही प्रामुख्याने बाहेरील कंत्राटदार विरुद्ध स्थानिक संसाधनाच्या व्यवसायिक शोषणाविरुद्ध सुरू झाली होती.

१५. भारतातील टिहरी आणि नर्मदा या दोन संघर्षांनी जगभरातील लोकांच्या पर्यावरणीय अव्यवस्था,चुकीचे धोरण या विरोधात चेतना जागृत केल्या.

१६. चिपको चळवळ ही पारंपारिक विध्वंसक अर्थव्यवस्थेच्या विरोधात शाश्वत अर्थव्यवस्थेसाठी पर्यावरण शास्त्राची एक शक्तिशाली चळवळ झाली.

१७. चिपको चळवळ ही गांधीवादी लढ्याचेच एक रूप होते. कारण या चळवळीने पर्यावरण रक्षणाच्या नावाखाली शोषण करणाऱ्या आणि जुलमी राजवटीला विरोध केला.

१८. चिपको आंदोलनाचे नेतृत्व देखील गांधीवादी असणाऱ्या चंडी प्रसाद भट्ट सुंदरलाल बहुगुणा हे होते त्यांचे आंदोलनाचे तंत्र गांधीजींचा सत्याग्रह हे होते

१९. ऐतिहासिक तात्विक आणि संघटनात्मक दृष्ट्या चिपको चळवळ पारंपारिक गांधीवादी सत्याग्रहांचा विस्तार होता.

२०. चिपको चळवळ ही एक महत्त्वाची पर्यावरणीय चळवळ आहे या चळवळीने गांधीवादी अहिंसक पद्धतीचा अवलंब करून लक्षणीय लोकप्रियता आणि यश मिळवले.[१०]

२१. चिपको आंदोलनानंतर भारतात पर्यावरण विषयक जागरूकता मोठ्या प्रमाणात वाढली.

**संदर्भ**

१ घाणेकर वि.वि., महात्मा गांधी आणि एकविसावे शतक, प्रेषक प्रकाशन, पुणे. (२००५) .
२ यंग इंडिया,२०ऑक्टोबर १९२७ चा अंक.
३ दैनिक पुढारी, २ ऑक्टोबर २०१८, राजू मुळे यांचा लेख.
४ यंग इंडिया,२६ सप्टेंबर १९२९ अंक.
५ विभूते भालबा,संपादक,महात्मा गांधी विचार ,प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.(२०१०)
६ निर्मल कुमार,गांधी कार्य व विचार प्रणाली, अनुवाद भा.रा.बापट,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७३.
७ जाधव श्रीराम, संपादक,गांधीजी आणि सामाजिक समता, महात्मा गांधी अध्ययन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद.(२००९)
८ देवळांकर शैलेंद्र, समकालीन जागतिक राजकारण,विद्या बुक्स,औरंगाबाद(२००५)
९ Diwakar R.R.Gandhiji's basic address and some modern problems, Has sell Street Press,(2021)
10 UNFCC report of Nairobi work programme on effect vulnerability and of adoption to climate change, April 2017.
Web-1 www.india.gov.in
2 www.Uuesco.org
3 www.envis.nic.
4 www.moef.gov.in